# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १४.०३.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार **दिनांक १४ मार्च २००७** रोजी मा.महापौर डॉ.भागवत किशनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी १२.०५ वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली . सभेला मा.प्र.आयुक्त म्हणून उपआयुक्त महसूल तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१०. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
११. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१२. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१३. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१४. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१६. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१७. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१८. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१९. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२०. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२१. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२२. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२५. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२६. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२७. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद

२८. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२९. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३०. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३१. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
३२. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३३. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३४. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३५. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३६. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३७. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३८. स.स.श्री.खान निसार मो.खान
३९. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
४०. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४१. स.स.श्रीमती मुमताज बेगम वाहेद खान
४२. स.स.सौ.राऊत छाया विलास
४३. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४४. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४५. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४६. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४७. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४८. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४९. स.स.श्री.पटेल सलीम समशेर पटेल
५०. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
५१. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५२. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५३. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५४. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५५. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५६. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५७. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५८. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५९. स.स.श्री.खुडे विजय किसन
६०. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६१. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६२. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६३. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६४. स.स.श्री.भगवान देविदासराव घडमोडे

६५. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६६. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६७. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६८. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६९. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७०. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७१. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
७२. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७३. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७४. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७५. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७६. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७७. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७८. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७९. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८०. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८१. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
८२. स.स.सौ.जैन अल्पा विकास
८३. स.स.श्री.बारवाल गजानन
८४. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८५. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०२. स.स.श्री.राजेश व्यास
०३ स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

**विषय क्र. ७७९ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(३)अन्वये स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (०८) सदस्यांच्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे (सन २००७ चा महाराष्ट्र अद्यादेश क्र.०२ अन्वये नव्याने समाविष्ट केलेले) कलम ३१- अ अन्वये पालिका सदस्यांतून ८ (आठ) सदस्यांची नियुक्ती करणे.

श्री.सलीम पटेल : निवडणूकीची सभा असून सूध्दा ३५ मिनिटे उशीरा सभा सुरू झालेली आहे.

मा. महापौर : स्थायी समितीचे आठ नवीन सदस्य नियुक्त करायचे आहे. त्यासाठी सर्व गटनेत्यांनी माझेकडे पत्र दयावे. राष्ट्रवादीचे श्री. मनमोहनसींग ओबेरॉय यांचे पत्र माझेकडे आलेले आहे. तसेच शिवसेनेचे गटनेते व सभागृहनेता श्री. संतोष खेंडके यांचे सूध्दा पत्र माझेकडे आलेले आहे. काँग्रेस आय गट नेत्याचे पत्र अदयाप आलेले नाही. भारतीय जनता पक्षाचे पत्र आलेले आहे.

श्री. सलीम पटेल : ज्या पक्षाच्या गट नेत्यांचे पत्र आपल्याकडे आलेले नाही त्यास आम्ही जबाबदार नाही. सभेची वेळ होवून गेली. ज्यांचे पत्र आलेले आहे त्यांची नावे जाहीर करावीत.

श्री.काशिनाथ कोकाटे : ज्या विषयाच्या संदर्भात सभा आयोजित केली आहे त्या त्या गट नेत्यानी आपणाकडे पत्र दिलेले आहे या सभागृहामध्ये पक्षाच्या चिन्हा व्यतिरिक्त काही लोकप्रतिनिधी हे अपक्ष म्हणून निवडून आलेले आहे. नवीन अध्यादेश शासनाचा आलेला आहे त्यानूसार ही आजची सभा आयोजित केलेली आहे.त्यानूसार स्थायी समितीच्या आठ संदस्यांची नियुक्ती आपण करणार आहात. अध्यादेश हा २७ फेबुवारी ला शासनाने काढलेला आहे. परंतु तत्पूर्वी या महानगरपालिकेला दोन वर्ष निवडणुका होवून पूर्ण झालेले आहे. म्हणून सभागृहामध्ये जे अपक्ष स. सभासद आहे जे जनतेनी लोकशाही मार्गाने लोकप्रतिनिधी म्हणून प्रतिनिधीत्व करण्यास पाठविले आहे. त्या सदस्याचे या सभागृहात काय मत राहील. त्यांचा जो अधिकार आहे तो त्यांना मिळणार आहे की नाही.किंवा अपक्ष स. सदस्यांमधून स्थायी समितीचे सदस्य म्हणून नियुक्त करणार आहात काय ?सर्वांना विश्वासात घेऊन संख्याबहावर लोकप्रतिनिधीत्व मिळावे याची काळजी आपण घ्यावी.असे त्यामध्ये म्हटलेले आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय: जे आताच स. सदस्य श्री. कोकाटे यांनी म्हटल्या प्रमाणे तेवढा वेळ आता नाही. सर्वांना संधी मिळावी जेणे करून सर्वामध्ये समन्वय राहील अशी विनंती आहे. ज्यांचे नाव समोर आलेले आहे ते जाहीर करावे.

मा. महापौर : यामध्ये जे भारतीय बहुजन महासंघ आणि बहुजन समाजवादी पार्टीचे सदस्य आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य : ज्या गट नेत्याकडून ज्यांची नावे आलेली असतील व ती त्यांचे संख्या बळाअनुरूप असतील तर जाहीर करण्यास हरकत नसावी.तसा स्पष्ट उल्लेख जी.आर मध्ये दिलेला आहे.

श्री.संजय सिरसाट : संख्या बळानूसार आपणाकडे आलेली नावे किती आहेत.

श्री.गजानन बारवाल : कोणकोणत्या पक्षाचे पत्र आलेले आहे. काय माहिती आलेली आहे जाहीर करावे.

श्री.संतोष खेंडके : नवीन अध्यादेशानूसार पिठासीन अधिकारी म्हणून आपल्याला अधिकार आहे. नावे जाहीर करावी.

श्री.सलीम पटेल : पक्षनिहाय माहिती द्यावी. कोणत्या पक्षाचे किती सदस्य आहेत.

मा. महापौर :सर्व गट नेत्याचे पत्र पिठासीन अधिकारी म्हणून माझेकडे आलेले आहे. पक्षाचे संख्याबळ पुढील प्रमाणे आहे. शिवसेना २६,भारतीय जनता पार्टी २१, काँग्रेस आय २०, राष्ट्रवादी काँग्रेस १३, बीआरपी -२,आरपीआय -(अ) -१,आरपीआय -(ड) १,पीआरपी (ड) -१, बीएसपी -१ , अपक्ष -१२ असे एकुण ९८ स.सभासद आहेत.

श्री.संजय सिरसाट : स्थायी समितीचे आठ सदस्यांची निवड करायची आहे. वेगवेगळया गटनेत्याकडून जर आठच नावे आली असेल तर नांवे जाहीर करण्यास हरकत नाही.

मा. महापौर : जे आठ स.सदस्यांची नावे आलेली आहे ते घोषित करीत आहे.

१.स.श्री. पुरूषोत्तम ठाकूर , ०२. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले,०३. श्री. कचरू विश्वनाथ मोरे, ०४.श्रीमती जयश्री किवळेकर ०५.श्री. संजय रामदास जोशी,०६.श्री. अ. रशिद खॉन (मामू),०७.श्री. अ. साजेद अ. सत्तार, ०८.श्री.वसंत नरवडे पाटील या आठ सदस्यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.असे जाहीर करण्यात येते. सुधारीत नियमाच्या तरतुदीप्रमाणे स्थायी समिती सभापती निवड करण्यासाठी स्थायी समितीची विशेष सभा एप्रिल २००७ मध्ये घेण्यात यावी. नियमान्वये विशेष सभेची तारीख निश्चित करायचे अधिकार महापौरांना आहे.त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात सभागृह नेता,विरोधी पक्षनेता व इतर पक्षांचे पक्षनेता यांचे बरोबर विचारविनिमय केल्यानंतर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ (अ) (२) अन्वये खालील पालिका सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

०१. श्री.पुरूषोत्तम रघुविरसिंग ठाकुर
०२. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
०३. श्री.कचरू विश्वनाथ मोरे
०४. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
०५. श्री.संजय रामदास जोशी
०६. श्री.अब्दुल रशिद खान मामु
०७. श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०८. श्री.वसंत पांडुरंग नरवडे पाटील

तसेच स्थायी समिती सभापतीची निवड करणेसाठी स्थायी समितीची विशेष सभा महापौर यांचेकडून तारीख निश्चित करून एप्रिल २००७ मध्ये घेणेस सर्वानुमते मंजुरी घेण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

(याच वेळी मा.पिठासीन अधिकारी तसेच मा.उपमहापौर यांनी नुतन आठ स्थायी समिती सदस्य यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.)

यानंतर ‘‘राष्ट्रगिताने ‘‘सभा संपल्याचे मा. पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.